**प्रेस नोट दि.२९/०३/२०१९**

पुणे शहर पोलीसांच्या **"बिट मार्शल"** साठी होंडा मोटार सायकल ॲन्ड स्कुटर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांचे तर्फे सी.एस.आर इनिशिएटीव्हचा भाग म्हणून ११० सी.सी. च्या होंडा लिवो १०० मोटार सायकल विनामुल्य देण्यात आल्या आहेत.

विमाननगर पोलीस स्टेशनचे तत्कालीन पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.रमेश साठे यांनी होंडा मोटार सायकल ॲन्ड स्कुटर इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे, सेक्शन मॅनेजर, जनरल अफेयर्स, वेस्ट रिजन श्री अमित उदास यांचे मार्फत मा.पोलीस आयुक्त पुणे शहर डॉ.के.व्यंकटेशम यांची बिट मार्शल यांना अत्याधुनिक मोटार सायकल पुरवून अधिक सक्षम करण्यासंदर्भातील संकल्पना सांगितली. सदर संकल्पनेला मान देऊन श्री हरभजन सिंग, डायरेक्टर जनरल, कार्पोरेट अफेअर्स, यांची व मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांची भेट झाल्यानंतर त्यांनी सर्व सुविधाने युक्त ११० सीसी च्या १०० लिवो मोटार सायकल पुणे शहर पोलीस दलासाठी देण्याचे मान्य केले.

सुमारे एक महिन्याचे कालावधीत सर्व प्रक्रिया पुर्ण करुन आज दि.२९/०३/२०१९ रोजी १०० मोटार सायकल पुणे शहर पोलीसांकडे सुपुर्द करण्याचा कार्यक्रम शिवाजीनगर पोलीस मुख्यालय येथे १२.०० ते ०१.०० वा.यावेळेत पार पडला.

सदर मोटार सायकल सोबत दोन हेल्मेट, सायरन, फ्लॅश लाईट, पी.ए.सिस्टीम अशा सुविधांनीयुक्त असलेल्या देण्यात आल्या आहेत. तसेच रजिस्ट्रेशनचा खर्च देखील होंडा मोटार सायकल कंपनी तर्फे करण्यात आला आहे.

सदर कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री.रविंद्र सेनगावकर, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, आभार प्रदर्शन श्रीमती स्वप्ना गोरे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय व कार्यक्रमाचे सुत्र संचालन श्री बच्चन सिंग, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २ यांनी केले. कार्यक्रमासाठी अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री.प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त श्री. सुनिल फुलारी, सर्व पोलीस उप आयुक्त, सर्व सहायक पोलीस आयुक्त, सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाहतूक शाखा व पोलीस स्टेशन कडील पोलीस अधिकारी व कर्मचारी हजर होते.

होंडा मोटार सायकल व स्कुटर इंडिया प्रा.लिमीटेड यांचेतर्फे श्री हरभजन सिंग, डायरेक्टर जनरल कार्पोरेट अफेअर्स, श्री.शरद प्रधान, सीएसआर हेड, श्री अमित उदास, सेक्शन मॅनेजर, जनरल अफेअर्स, वेस्ट रिजन, श्री अयाज शमशुद्दिन ठाणावाला, डिलर, स्टर्लिंग होंडा, श्री मियानो, डेप्युटी डायरेक्टर वेस्ट रिजन व इतर मान्यवर उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे वेळी श्री.हरभजन सिंग यांनी पुणे पोलीस दलातील महिला अधिकारी व कर्मचारी यांचे लहान मुलांसाठी सुरु करण्यात येत असलेल्या एकूण ०५ पाळणाघरांचा खर्च करणार असल्याची घोषणा केली.

**(कल्याणराव विधाते)**
सहायक पोलीस आयुक्त,
मानव संसाधन विभाग, पुणे शहर.




Flag off Ceremony
Quick Response Team (Beat Marshalls)
At
Police Parade Ground, Pune,
On
29th March, 2019
Honda Striving to be a Company that Society wants to ex